# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 14 December 2024**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १४ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात मंत्रिमंडळाचा विस्तार.
- ‘एक देश-एक निवडणूक’शी संबंधित दोन विधेयकं सोमवारी लोकसभेत सादर होणार.
- अविष्कार 2024 च्या विद्यापीठस्तरीय फेरीत पावणे दोनशे प्रकल्पांचं सादरीकरण.

आणि

- बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेत तिसऱ्या सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे वाया.

****

राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असून, महायुतीतल्या तीनही पक्षांचे नवनिर्वाचित आमदार यावेळी मंत्रिपदाची शपथ घेतील. नागपूर इथं राजभवनात उद्या रविवारी सायंकाळी चार वाजता हा शपथग्रहण समारोह होणार आहे. राजभवनातून ही माहिती देण्यात आली.

दरम्यान, मंत्र्यांची यादी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवण्यात आली असून तिथून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आमदारांना सूचित केलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना दिली. गेल्या आठवड्यात ५ डिसेंबर रोजी मुंबईत एका भव्य समारंभात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर

एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत नवं सरकार स्थापन केलं आहे.

****

'एक देश–एक निवडणूक'शी संबंधित दोन विधेयकं लोकसभेत सोमवारी सादर केली जाणार आहेत. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल संविधान सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा विधेयक लोकसभेत मांडतील. 'एक देश – एक निवडणूक' या संकल्पनेची पडताळणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारसी नुकत्याच सरकारने स्वीकारल्या असून देशभरात एकाचवेळी निवडणूका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने विविध राजकीय पक्षांसह तज्ज्ञांशी याबाबत विस्तृत चर्चा केली. या अंतर्गत निवडणूक प्रक्रिया दोन टप्प्यात राबवली जाईल. पहिल्या टप्प्यात लोकसभेची निवडणूक आणि सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घेतल्या जातील. तसंच या निवडणुका झाल्यानंतर शंभर दिवसांच्या आत दुसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातील.

****

राज्यघटना स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत कालपासून संविधानावर विशेष चर्चा सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या या चर्चेला उत्तर देत आहेत.

***संविधान निर्माताओं की जो भावना थी, उसको जिने में पिछले पचहत्तर साल भारत का नागरिक हर कसोटी पर खरा उतरा हैं। और इसलिए भारत का नागरिक सर्वाधिक अभिनंदन का अधिकारी है।***

दरम्यान, आज चर्चासत्राची सुरुवात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजेजू यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानाचं त्यांनी यावेळी कौतूक केलं. देशाने स्वातंत्र्यानंतर प्रत्येक नागरिकाला समान अधिकार दिले आहेत. अल्पसंख्याकांसोबत कोणताही भेदभाव केला जात नाही आणि त्यांना कायदेशीर संरक्षण असल्याचं रिजिजू म्हणाले. देशातील सहा अल्पसंख्याक समुदायांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या जात असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

द्रविड मुन्नेत्र कळघमचे सदस्य ए. राजा यांनी चर्चेत भाग घेत लोकशाही, कायद्याचं पालन आणि धर्मनिरपेक्षता तसंच समानतेचं पालन होत नसल्याची टीका केली. सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांनी या टीकेचा निषेध करून द्रमुकने माफी मागावी अशी मागणी केली.

तेलगुदेशम पार्टीचे लहु श्री कृष्ण देवरायलु यांनी, संविधान निर्मितीच्या वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत तीनशे एकोणनव्वद सदस्य होते, याकडे लक्ष वेधलं. भाजपचे तेजस्वी सूर्या यांनी, १९७४ मध्ये संविधानात सांगितलेल्या कोणत्याही उचित प्रक्रियेचं पालन न करता कच्चातीवू बेट श्रीलंकेला दिल्याचा मुद्दा उपस्थित करत, काँग्रेसवर टीका केली.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सत्तारूढ पक्षावर संविधान कमकुवत करण्याचा आरोप केला. त्यांनी बेरोजगारी, अग्निवीर योजना, शेतकरी आणि महिलांवरील कथित अत्याचारांच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केले. विद्यमान सरकारच्या काळात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समानता नष्ट झाल्याचा आरोप केला.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणमुक्त कृषी कर्जाची मर्यादा एक लाख साठ हजारांवरून दोन लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या एक जानेवारीपासून होणार आहे. शेतकऱ्यांना अधिक चांगली वित्तीय सुविधा पुरवणं हा यामागील उद्देश आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिलेल्या एका निवेदनात सांगितलं आहे.

****

मुंबई विद्यापीठात दुहेरी पदवी, सह पदवी आणि ट्विनिंग पदवी शिक्षणासाठी विद्या परिषदेनं मंजुरी दिली आहे. यानुसार विद्यार्थ्यांना दोन महाविद्यालयं किंवा उच्च शिक्षण संस्थांमध्ये एकत्र प्रवेश घेता येणार आहे. यामुळे शिक्षण प्रणालीमध्ये मोठा बदल होणार असून सर्वोत्कृष्ट शैक्षणिक पद्धतीच्या सामायीकीकरणाला प्रोत्साहन मिळेस, असं मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितलं. त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापीठात प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसच्या पदांच्या नियुक्तीलाही विद्या परिषदेनं मान्यता दिली आहे.

****

युवकांच्या कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या आविष्कार २०२४ या महोत्सवाची विभागीय फेरी आज डॉ बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठात सुरू आहे. कोल्हापूर

इथल्या डी वाय पाटील विद्यापीठाचे संशोधन-संचालक तथा अधिष्ठाता डॉक्टर सी. डी. लोखंडे यांच्या हस्ते या महोत्सवाचं आज सकाळी उद्‌घाटन झालं. विविध क्षेत्रात संशोधनाला व्यापक संधी आहेत, मात्र त्यातून उद्योजकीय संकल्पना विकसित होण्याची गरज, डॉक्टर लोखंडे यांनी यावेळी व्यक्त केली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विजय फुलारी यांनी यावेळी बोलतांना, नवनवीन संकल्पनांसाठी अविष्कार हे एक व्यासपीठ असून, ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी असल्याचं सांगितलं. या आविष्कार महोत्सवासाठी चार जिल्ह्यांतून विद्यापीठस्तरीय संघ निवडण्यात आले, यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून - १२५, जालना-२५, बीड-४५, तर धाराशिव जिल्ह्यातून -६२ असे २४८ संशोधक विद्यार्थी सहभागी झाले. मानव्य विद्या, भाषा, ललित कला, वाणिज्य, विधी, विज्ञान, कृषी, पशुसंवर्धन, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषधनिर्माण आदी शाखेतून १७५ प्रकल्प या फेरीत सादर झाले आहेत.

****

मुंबई इथं डॉ. होमी भाभा विद्यापीठात झालेल्या, "नॅशनल कॉन्फरन्स ऑन डेटा सायन्स फॉर क्लायमेट रेसिलेन्स" या राष्ट्रीय परिषदेत, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठानं उल्लेखनीय यश संपादन केलं आहे. या परिषदेत कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयातील, विशाल दशरथराव काळबांडे यांनी सादर केलेल्या शोध निबंधाला, प्रथम क्रमांकाने गौरवण्यात आलं. तसंच तनुजा वाघ, किंजल मोरे, सुजय किंगे, नयन लोनगाडगे, प्रियंका बोरसे, सक्षम पंडितकर, आणि काजल कुमारी या विद्यार्थ्यांनीही उच्च दर्जाचे संशोधन शोधनिबंध सादर केले. या सर्व विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्याहस्ते गौरव करण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागात कार्यरत प्राध्यापक डॉ.योगेश दिलीपराव राजेंद्र त्यांच्या संशोधनासाठी पेटंट मिळालं आहे. डॉ राजेंद्र यांनी रुग्ण, वयोवृध्द, बालक, तसंच पाळीव प्राण्यांच्या दैनंदिन वागणुकीवर लक्ष ठेवून त्यांना त्याप्रमाणे मदत करण्यासाठी तसंच त्यांची काळजी घेण्यासाठीचं एक उपकरण विकसित केलं आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनात प्रा.डॉ.सोनाली भगवानराव कुलकर्णी आणि प्रा.डॉ.अमरसिंह भीमराव यांनी त्यांना सहकार्य केलं आहे. या यशाबद्दल सर्व संशोधकांचा सत्कार करण्यात आला.

****

दत्तजयंती आज ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी होत आहेत. माहूर इथल्या दत्तशिखरासह औदुंबर, गाणगापूर, नृसिंहवाडी, या प्रमुख स्थानांसह विविध दत्त मंदिरात पहाटेपासून भाविकांची रीघ लागली आहे. यासह काकड आरती, मंगलआरती, अभिषेक, महापूजा, नैवेद्य, महाआरती, महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत.

****

जालना-सिंदखेडराजा मार्गावर आयशर ट्रक आणि बसची समोरासमोर धडक होऊन दोन प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १८ ते २० प्रवासी जखमी झाले. जखमींमधील काहींची प्रकृती चिंताजनक आहे. नाशिक-नांदगाव डेपोची ही बस जालन्याहून सिंदखेडराजाकडे जात असताना, नाव्हा शिवारात आज दुपारच्या सुमारास ही दुर्घटना घडली. जालना पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी मदतकार्य करत जखमींना उपचारासाठी तातडीनं जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवलं आहे.

****

क्रिकेट

बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आज पहिल्या दिवशी खेळ होऊ शकला नाही. ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन इथं सुरू झालेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेत, यजमान संघाला फलंदाजीसाठी पाचारण केलं. ऑस्ट्रेलियाच्या बिनबाद २८ धावा झाल्या असतांनाच पाऊस आल्यानं, खेळ थांबवावा लागला, तो दिवसभरात पुन्हा सुरू होऊ शकला नाही. मालिकेत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून बरोबरीत आहेत.

****